१ 

पर्यावरण विभाग
जा.क्र.मनपा/पर्या/कार्या-१/९०/२०१९
दिनांक :-२६/११/२०१९

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

मा.मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल जनहित याचिका क्र.१७६/२०१२ मधील निर्देशानुसार तसेच मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र.कक्ष-१५/क.शु.-२/२०२/२०१९, दि.२०/०२/२०१९ अन्वये स्थापन्न केलेल्या नाशिक महानगरपालिका स्तरावरील उपसमितीच्या दि.**१८/०९/२०१९** रोजीच्या द्वितीय बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक १८/०९/२०१९ रोजी दुपारी १२.०० ते ०१.१५ या वेळेत मा.आयुक्त सो. यांचे दालनात मा.उच्च न्यायालयात दाखल गोदावरी प्रदुषण जनहित याचिका क्र.१७६/२०१२ मधील मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी आजपावेतो जे जे आदेश दिलेले आहेत, त्या मुद्यांचा व नव्याने दि.१८/१२/२०१८ रोजी दिलेल्या निर्देशा बाबतचा, तसेच निरीने दिलेल्या शिफारशींचा, तसेच गोदावरी प्रदुषण नियंत्रणाबाबत चर्चा करणेसाठी नाशिक मनपा स्तरावरील उपसमितीची द्वितीय बैठक आयोजीत केली होती.

१) मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका
२) अतिरीक्त आयुक्त तथा अधिक्षक अभियंता, सा.आ.अ.वि.(मलनि)
३) अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) यांचे प्रतिनिधी
४) कार्यकारी अभियंता (पर्यावरण)
५) निरीचे प्रतिनिधी श्री.कौस्तुभ कारंडे
६) सहा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
७) माहिती उपसंचालक, नाशिक यांचे प्रतिनिधी
८) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांचे प्रतिनिधी
९) सुरक्षा अधिकारी, मनपा
१०) श्री.राजेश पंडीत, अशासकिय सदस्य (याचिका कर्ते)
११) श्री.निशिकांत पगारे, अशासकिय सदस्य (याचिका कर्ते)

सदर बैठकीतील मुददे व त्यावर केलेली /करावयाची कार्यवाही तथा निर्देश खालील प्रमाणे

| अ.क्र. | बैठकीतील मुददा | बैठकीत झालेली चर्चा, केलेली/ करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | तक्रार नोंदविण्यासाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देणेबाबत | टोल फ्री क्रमांक<br>१) १८००२३३१९८२<br>२) ७०३०३००३००<br>सदर टोल फ्री नंबर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.<br>तसेच नाशिक महानगरपालिकेचे Online Grievance App "NMC e-connect" उपलब्ध असुन त्यामध्ये गोदावरी व तिच्या उपनदयांशी संबंधित तक्रारी नोंदविण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.<br>मा.आयुक्त सो. यांनी तक्रारीची नोंदवही ठेवणेबाबत आदेशीत केले, व त्यामध्ये कोणाचा तक्रारीचा फोन आला आहे, किती वाजता आला, तक्रारीचे स्वरुप, याबाबत माहिती असावी, व सदरची माहिती कार्यकारी अभियंता यांना आठवडयातून एकदा व अतिरीक्त आयुक्त यांना महिन्यातून एकदा देण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| २ | निरीच्या शिफारशी, स्मार्ट सिटीच्या प्रोजेक्ट गोदा अंतर्गत १७ प्राचीन कुंड, नदी स्वच्छता बाबत | मा.आयुक्त सो. यांनी निरीच्या शिफारशीबाबत आदेशित केले की, स्मार्ट सिटीच्या गोदावरी नदी संबंधातील प्रकल्पांबाबत गोदावरी संवर्धन कक्षाने समन्वय ठेवावा. तसेच गोदावरीचे १७ कुंडांबाबत अभ्यास करुन याबाबतचा सिटी सर्व्हेचा मॅप व प्राचार्या डॉ.प्राजक्ता बस्ते यांनी तयार केलेला प्राचीन कुंडांबाबतचा अहवाल मनपाच्या वेबसाईटवर टाकावा, व त्यामध्ये स्मार्ट सिटीच्या स्कोप ऑफ वॅर्क, तसेच काम करण्याऱ्या मक्तेदारांची संपुर्ण माहिती, व जे काम करण्यात येणार आहे, त्याबाबतची माहिती टाकावी. तसेच नद्यांच्या स्वच्छतेबाबत जी एजन्सी नेमली आहे, त्याबाबत माहिती वेबसाईट वर टाकावी. त्यामध्ये निरीच्या व मा.कोर्टाचे निर्देशाबाबत मुद्यांचा समावेश करावा. |
| ३ | अस्तित्वातील मलनिःसारण केंद्रांच्या आधुनिकीकरणाबाबत | मा.आयुक्त सो. यांनी S.T.P. चे Upgradation चे कामकाजाबाबत आढावा घेतला. त्यामध्ये निरी, कन्सल्टन्ट व मनपा अधिकारी यांनी लवकरात लवकर एकत्रित बैठक घ्यावी, असे निर्देश दिले.<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नविन मानकांनुसार अस्तित्वातील मलनिःसारण केंद्रांचे आधुनिकीकरण करणेचा प्रस्ताव तयार करणेत आला असुन निरीच्या मान्यतेस्तव पाठविणेत आलेला आहे व निरीच्या मान्यते नंतर राष्ट्रिय नदी कृती योजने अंतर्गत मा. महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण विभागा मार्फत मा. केंद्र शासनाकडे पाठविणेत येणार आहे. |
| ४ | विनाप्रक्रिया मलजल<br>कपिला संगमावर असलेल्या नाल्यामधुन व उपनदयांमध्ये काही वेळेस मल प्रवाह गोदावरी नदीपात्रात सोडण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, ते बंद होणे आवश्यक आहे. | पुरामुळे ड्रेनेज लाईनचे नुकसान झाल्यामुळे चेंबरची दुरुस्ती सुरु आहे, ती लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावी. तसेच मा. उच्च न्यायालयाचे निर्देश व निरीच्या शिफारशींच्या अंमलबजावणी बाबत मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षते खालील समितीच्या वेळोवेळी होणाऱ्या बैठकांमध्ये दिलेल्या निर्देशांनुसार कार्यवाही करण्यात यावी. |
| ५ | जनजागृती | मा.आयुक्त सो. यांनी असे निर्देश दिले की विभागीय माहिती कार्यालयाच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने जनजागृती बाबत माहिती आराखडा तयार करावा. स्वच्छता अभियान, जनजागृती करणेकरीता घंटागाडी वर व मनपाच्या होर्डींगवर खालील बाजूस थोडी जागा सोडून लोकांमध्ये तसेच शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी यांनी शाळांमधील जनजागृती बाबत कार्यवाही करावी, असे<br>निर्देशीत केले. |
| ६ | गणेश विसर्जन | नाशिक मनपाने मुर्तीदान, निर्माल्य संकलन व अमोनियम बायोकार्बोनेट वापराबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली.<br>त्यावर श्री राजेश पंडीत यांनी घरात विर्सजनाचे प्रमाण वाढले आहे, व शाडू मातीचा वापर व्हायला लागला आहे, असे नमुद केले.<br>तसेच श्री निशिकांत पगारे यांनी गणपती विसर्जना बाबत ५ व्या दिवशीही गणपती विसर्जन केले गेले असे सांगितले. |

प. २१५

| | | |
|---|---|---|
| ७ | गोदावरी नदीसाठी पोलिस संरक्षण | मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार गोदावरी नदी साठी पोलिस उपलब्धतेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार ३० पोलिस कॉस्टेबल व ४ पी.आय. यांची नेमणूक करणेबाबत आदेशित केले आहे. |
| ८ | एम.आय.डी. हददीमधील होणारे प्रदुषण | एम.आय.डी.सी. च्या प्रदुषणाबाबत मा.विभागीय आयुक्त यांनी त्यांचेकडे झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार एम.आय.डी.सी. ने कार्यवाही करावी. |
| ९ | नदीची वहन क्षमता वाढवणे बाबत | मा. आयुक्त सो. यांनी संबंधित विभागांकडुन डिमार्केशन करण्याचे निर्देश दिले. |
| १० | पुर्नभरण | मा.आयुक्त साहेब यांनी मनपाच्या मालकीचे मिळकतींमध्ये पुर्नभरण, तसेच विहीरी शोधणेबाबत काम झाले पाहिजे असे सांगितले. त्यानंतर श्री पंडित यांनी वाडयामधील आड व प्राचिन बारव यांच्या पुर्नभरणा बाबत चर्चा केली. |
| ११ | प्लास्टिक बंदी | श्री. निशिकांत पगारे यांनी प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती बाबत मुददा उपसिथत केला असता त्यावर उचित कार्यवाही करणेबाबत निर्देश देणेत आले. |

याचिका कर्ते श्री.राजेश पंडीत यांनी नदी प्रदुषणाबाबत सांगितले की, २०१०-११ नंतर नदीबाबत सकारात्मक बदल झाला आहे, व कामकाज सुधारत आहे. पुर्वी नदी दिसतच नव्हती. आता ती दिसते तरी आहे, व आपण सर्वांनी मिळून तिला १००% प्रदुषण मुक्त करावयाची आहे, व भारतात एक आदर्श निर्माण करावयाचा आहे, असे सांगितले.

याप्रमाणे सदर बैठकीत चर्चा करणेत येऊन बैठक विसर्जीत करण्यात आली.

आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक